रविवार, दि. ९ मार्च २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २१८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# अवैधरित्या वृक्षतोड

## जालना शहर महापालिकामार्फत पोलिसांत गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी -** विना परवाना अवैधरित्या वृक्षतोड केल्याप्रकरणी जालना शहर महानगर पालिकेच्यावतीने तालुका जालना पोलीस ठाण्यात चार व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनपाचे प्रभारी उद्यान अधिक्षक विजय फुलंब्रीकर यांच्या फिर्यादीवर शनिवार (दि ८) रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, शहरातील मंठा चौफुली परिसरातील संतकृपा हॉस्पीटल जवळील स्वस्त मेडिकल समोरील सार्वजनिक रस्त्यावरील सुमारे २० वर्षांपुर्वीचे लिंबाचे झाड तोडल्या जात असल्याची माहिती मनपा प्रशासनाला मिळाली. या माहितीनुसार मनपाचे अधिकारी -कर्मचारी यांनी घटनास्थळी भेट दिली. त्यावेळी लिंबाचे झाड तोडल्या जात असल्याचे दिसून येत होते. शेख रफीक अहमद, शेख वहीद, शेख नवाब, इमरान अली खान हे चौघे ते झाड तोडत असल्याचे आढळून आले. चौघांनीही हे झाड मुदीत मदन जोगड यांच्या सांगण्यावरून तोडत असल्याचे मनपा अधिकाऱ्यांना सांगितले.

शासकीय परवानगी न घेता विनापरवाना सार्वजनिक रस्त्यावरील वीस वर्षांपुर्वीचे लिंबाचे झाड तोडण्यात आल्याबद्दल मुदीत मदन जोगड यांच्यासह शेख रफीक अहमद, शेख वहीद, शेख नवाब, इमरान अली खान यांच्या विरोधात तालुका पोलीस ठाण्यात शनिवार (दि ८) रोजी वृक्ष प्राधिकरणअंतर्गत गुन्हा करण्यात आला.

ही कारवाई शहर मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांच्या आदेशाने वृक्ष अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत व सहाय्यक आयुक्त अपर्णा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी उद्यान अधिक्षक विजय फुलंब्रीकर यांनी पार पाडली.




# ट्रम्प अपमान करत आहेत, भारताने सर्व वाटाघाटीतून माघार घ्यावी - श्रीवास्तव



**नवी दिल्ली -** आर्थिक थिंक टँक 'ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह'ने शनिवारी भारताने अमेरिकेबरोबरील वाटाघाटीमधून माघार घेतली पाहिजे. तसेच ट्रम्प प्रशासनाबरोबर चीन आणि कॅनडा सारख्या देशांप्रमाणे व्यवहार ठेवण्याची तयारी ठेवावी असे मत व्यक्त केले आहे.
अमेरिकेच्या फायद्यासाठी अनुकूल असलेल्या व्यापार मागण्या मान्य करण्यासाठी अमेरिका भारतावर प्रचंड दबाव आणत आहे असेही ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्हचे संस्थापक अजय श्रीवास्तव म्हणाले आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांच्या अधिकार्यांनी बहुतेक वेळा चुकीचा डेटा वापरून भारतावर टीका केल्याचेही श्रीवास्तव म्हणाले.

श्रीवास्तव म्हणाले की, ट्रम्प हे चुकीचा डेटा वापरून उघडपणे भारताचा अपमान करत आहेत. अशा परिस्थितीत कोणतेही संतुलित निष्कर्षापर्यंत पोहचणे शक्य नाही. भारताने सर्व वाटाघाटींम धून माघार घेतली पाहिजे आणि इतर देशांप्रमाणे त्यांचा करण्याची तयारी ठेवावी. अमेरिकेने लादलेल्या करांच्या विरोधात चीन आणि कॅनडाने देखील जोरदार प्रत्युत्तर देण्यास सुरूवात केली आहे.

शुक्रवारी ट्रम्प यांनी दावा केला होता की, त्यांनी भारताच्या अनुचित व्यापार पद्धती उघड केल्यानंतर भारताने अमेरिकेतून आयात होणाऱ्या मलावरील कर कपात करण्यास होकार दिला आहे. मात्र श्रीवास्तव यांनी ट्रम्प यांचा दावा फेटाळून लावला आहे. हे साफ खोटे आहे आणि याचा भारतावर दबाव टाकण्याचा उद्देश आहे. भारताची शांतता ही गोंधळात टाकणारी आहे आणि भारताने खऱ्या माहितीसह उत्तर देणे आवश्यक आहे. ट्रम्प आणि त्यांचे अधिकारी भारताला कमी लेखत असल्याचे संपूर्ण जग पाहात आहे, असे श्रीवास्तव म्हणाले आहेत.

अमेरिकेने चीन, कॅनडा, मेक्सिको आणि भारतावर कर लादण्याची घोषणा केली होती. ट्रम्प यांनी चीनवर २० टक्के आणि कॅनडावर २५ टक्के कर लादण्याची घोषणा केली होती. तर भारतावर देखील रेसिप्रोकल टेरिफ लावणार असल्याचे म्हटले.

ट्रम्प यांच्या या घोषणेनंतर चीन आणि कॅनडा यांनी प्रत्युत्तर दिले आहे. कॅनडाने देखील ३० अब्ज कॅनेडियन डॉलर किमतीच्या अमेरिकन आयतीवर कर पान २ वर

युवा आदर्श

## नारी ...

नारीला आत्मसन्मान
नको उगाचं कुबड्या
उभे रहायचे सक्षम
लक्षात घे रे बबड्या
कितीदा केले सिध्द
दुर्बल नाही बांगड्या
संधी देता महिलांना
सबबी सांगे लंगड्या
जिजाऊची वंशज ती
पळवे शत्रूसभगोड्या
इतिहास देईलं साक्ष
पुरुषापेक्षाही तगड्या
अहिल्या झाशी तारा
रे धगधगत्या शेगड्या
सिंधु साक्षी मल्लेश्वरी
पदक विजेत्या वेड्या
सावित्री रमाई बनल्या
केवढ्या सक्षम जोड्या
शिक्षीत प्रगत महिला
हरेक क्षेत्रात घे उड्या
मिरा मुक्ताई जनाईला
लक्षात ठेवती पिढ्या
इंदिरा सुषमा प्रतिभा
सावरे देशाच्या नाड्या
बरोबरीने उभी महिला
तुझ्याचं शेजारी गड्या
महिला असते अबला
बोलतोस का गधड्या

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# समाजोपयोगी कार्य व महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी स्वत:ला वाहून घ्यावे

## महिला दिन साजरा; आयुक्त खांडेकर यांचे मार्गदर्शन

**जालना । प्रतिनिधी -** समाजोपयोगी व महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी सर्वांनी झटावे स्वतःला या कार्यात वाहून घ्यावे असे जालना शहर मनपाचे आयुक्त संतोष खांडेकर यांनी म्हटले आहे. जागतिक महिला दिनानिमित्त शनिवार (दि ८) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात जालना शहर महानगरपालिकेतर्फे महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी ते मार्गदर्शन करत होते.

यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत, उपायुक्त गायकवाड, सहा. आयुक्त अपर्णा जाधव, सहा. आयुक्त चव्हाण, केशव कानपुडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी राजमाता माँ जिजाऊ, सावित्रीबाई फुले, माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.




उपस्थितांना मार्गदर्शन करतांना श्री खांडेकर यांनी म्हटले की, समाजोपयोगी व शहरातील नागरिकांसह महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहावे, स्वतःला या कार्यात झोकून देऊन काम करावे.

अतिरिक्त आयुक्त राजपुत, उपायुक्त गायकवाड, सहाय्यक आयुक्त जाधव यांनी देखील उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी मनपाचे अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# आयशा पठान व रजा पठान यांचा पहिला रोजा



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा येथील रहिवासी फळांचे व्यापारी मोसीन न्यामत पठाण यांची मुलगी आयशा पठाण (वय ७ वर्षे) व मुलगा रजा पठाण (वय १० वर्षे) या दोघा बहिण भावांनी पवित्र रमजान महिन्यातील पहिला रोजा पूर्ण केला आहे. रखरखत्या उन्हात त्यांनी आपला रोजा पूर्ण केल्याबद्दल त्यांचे वडील मोसीन पठाण, आजोबा न्यामत पठाण, आमद पठाण, काका मोबीन पठाण, शेख मुस्ताक, पत्रकार अशफाक शेख, असमारा फातेमा पठाण, फरहहान शेख इब्राहीम शेख यांच्यासह नातेवाईकांनी अभिनंदन केले आहे.

# अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत यांना इनरव्हील होरायझनचे मानद सदस्यत्व

## प्रशासनातील समर्पित महिला नेतृत्वाचा आम्हाला सार्थ अभिमान - ॲड. धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -** जागतिक महिला दिनानिमित्त इनरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनतर्फे जालना महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत यांना मानद सदस्यत्व प्रदान करून गौरविण्यात आले. क्लबच्या अध्यक्षा ॲड. अश्विनी महेश धन्नावत यांनी त्यांना मानद सदस्यपदाची विशेष ओळख पिन प्रदान केली.

या वेळी प्रियंका राजपूत यांनी महिलांसाठी सदैव




कार्यरत राहण्याची वचनबद्धता व्यक्त केली. तसेच, क्लबच्या माध्यमातून महानगरपालिकेला विकासात्मक कार्यात सहकार्य करण्याचे आवाहन केले. विवाह नोंदणीच्या जागरूकतेसाठी विशेष मोहिमेची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. विवाह नोंदणी केल्याने महिलांना भविष्यात कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, तसेच नाव बदलण्याच्या प्रक्रियेत सुलभता यावी, यासाठी प्रयत्न करण्याचे त्यांनी सुचविले. विवाह नोंदणी झाल्यानंतर त्याची नोंद महानगरपालिका कार्यालयात त्वरीत करावी, असे त्यांनी सांगितले. यावेळी क्लबच्या अध्यक्षा ॲड. अश्विनी धन्नावत म्हणाल्या की, महिला सशक्तीकरण आणि सामाजिक विकासासाठी काम करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा गौरव करणे हा आमच्या क्लबचा उद्देश आहे. प्रियंका राजपूत यांनी त्यांच्या धडाकेबाज आणि पारदर्शक कार्यशैलीने महानगरपालिकेत वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांचा प्रशासन व महिलांविषयक संवेदनशील दृष्टीकोन प्रेरणादायी आहे. समाजासाठी समर्पित अशा नेतृत्वाला आम्ही मानद सदस्य म्हणून सन्मानित करत आहोत, याचा आम्हाला अभिमान वाटतो.

# मंठा ते उस्वद रोडचे खड्डे बुजवण्याचे काम थातूरमातूर!

## मनसे मंठाच्यावतीने आमरण उपोषण



**मंठा । प्रतिनिधी -** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आधिनिस्त मंठा ते उस्वद रोडचे खड्डे बुजवण्याचे काम थातूरमातूर पद्धतीने झाले असल्या संदर्भात निवेदक यांनी वारंवार सूचना देऊनहीपाठपुरावा करूनही सदर रस्त्याचे काम योग्य पद्धतीने झाले नसल्याने दि ७ मार्च शुक्रवार रोजी आमरण उपोषण ॲडजस्टमेंटवर होत असलेल्या या कामाची कुठलीही माहिती टेंडर इस्टिमेट नसल्याने माहितीचा अभाव धातुर्मातुर पद्धतीने खड्डे बुजवण्याचे काम कुठल्या निकष वर झाले या भ्रष्ट आणि उप विभागीय अभियंता सा. बां. उप-विभाग मंठा भ्रष्टाचारा विरूद्ध निवेदन देऊनही कुठले समाधान न झाल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेना मंठा शहराध्यक्ष गजानन माळकर यांनी अभियंता संभाजीनगर यांच्यासह महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांना मेल द्वारे कळवुन लोकशाही मार्गाचा अवलंब करून आमरण उपोषण सुरू केले असून संभाजी ब्रिगेड, वंचित बहुजन आघाडी,जय लहुजी सामाजिक संघटना व श्री साई ड्रायव्हर युनियन मंठा यांच्या वतीने पाठिंबा देण्यात आला.

# संपादकीय

## पतंगराव नव्हे रॉकेटराव!

महाराष्ट्रातील राजकारणात जवळपास तीस वर्ष आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमविणारे अजातशत्रू व्यक्तिमत्व असलेले काँग्रेसचे जेष्ठ नेते, महाराष्ट्राचे माजी मंत्री पतंगराव कदम यांची आज ७ वी पुण्यतिथी. ७ वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ९ मार्च २०१८ रोजी त्यांचे निधन झाले. ८ जानेवारी १९४४ रोजी पतंगराव कदम यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील सोनसळ या गावात एका गरीब कुटुंबात झाला. त्यांचे चौथी पर्यंतचे शिक्षण गावातल्या शाळेत झाले तर सातवी पर्यंतचे शिक्षण शिरसगाव या गावात झाले. ११ वी पर्यंतचे शिक्षण म्हणजे त्या काळातील मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण त्यांनी कमवा व शिका योजनेअंतर्गत पूर्ण केले. एफ. वाय बी. ए नंतर त्यांनी टीचर्स डिप्लोमा पूर्ण केला व शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बांधून पुणे गाठले. पुण्यातील हडपसर येथे दहा बाय दहाच्या पत्र्याच्या खोलीत राहून त्यांनी गोरगरिबांच्या मुलांना शिकवण्याचे काम सुरू केले. शिक्षक असतानाच गोरगरिबांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी काही तरी करावे असा विचार त्यांच्या मनात येऊ लागला त्यातूनच , भारती विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली गेली. बा. ग. पवार, वसंतराव म्हेत्रे, महादर सर, नीलाखे सर अशा पाच लोकांना घेऊन त्यांनी १० मे १९६४ रोजी भारती विद्यापीठाची स्थापना केली. त्यावेळी त्यांच्या खिशात अवघे ३८ रुपये होते. हळूहळू भारती विदयापीठाचा विस्तार वाढू लागला. शहराप्रमाणे ग्रामीण भागातही भारती विद्यापीठाच्या पाट्या झळकू लागल्या. भारती विद्यापीठामुळे गोरगरिबांच्या मुलांना इंग्रजीतून शिक्षण मिळू लागले. सर्वसामान्य कुटुंबातील मुले उच्च शिक्षण घेऊ लागली. त्यांनी लावलेल्या भारती विद्यापीठाच्या रोपट्याचे आज वटवृक्ष बनले आहे. के.जी ते पी.जे असे सर्वप्रकारचे शिक्षण आज भारती विद्यापीठातून मिळत आहे. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य महान असेच आहे. भारती विद्यापीठाचा पसारा सांभाळीत त्यांनी राजकारणातही ठसा उमटविला. १९६८ साली एस टी महामंडळाच्या सदस्यपदी त्यांची निवड झाली. गाव तिथे एस टी ही योजना राबवून त्यांनी गावागावात एस टी पोहचवली. १९८५ साली त्यांनी अपक्ष म्हणून विधानसभेची निवडणूक लढवली. त्यात ते विजयी झाले. १९९० सालच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने त्यांना तिकीट दिले तेंव्हापासून १९९५ सालचा अपवाद वगळता ते सतत निवडून आले. २०१४ साली मोदी लाटेत अनेक दिग्गज नेत्यांचा पराभव झाला पण त्यांनी आपला गड राखला. या दरम्यान त्यांनी शिक्षण, सहकार, उद्योग, महसूल, वन या महत्वाच्या खात्याची मंत्रीपदे सांभाळली. इतकी वर्ष मंत्रीपदावर राहूनही त्यांच्यावर एकही आरोप झाला नाही यातच त्यांचा कारभार किती पारदर्शक होता, हे दिसून येते. काँग्रेस पक्षावर त्यांची नितांत श्रद्धा होती. सत्ता असो वा नसो काँग्रेस पक्षाशी ते कायम एकनिष्ठ राहिले. प्रत्येकवेळी मुख्यमंत्र्यांच्या स्पर्धेत त्यांचे नाव कायम चर्चेत असायचे, पण दुर्दैवाने ते मुख्यमंत्री बनू शकले नाही. तरीही त्यांनी याबाबत कधीही जाहीर नाराजी व्यक्त केली नाही. पक्ष सोडण्याचा विचारही त्यांच्या मनात कधी आला नाही. आजच्या आयाराम गयाराम संस्कृतीत पतंगरावांची निष्ठा उठून दिसते. पतंगराव तरुण पिढीसाठी मार्गदर्शक आहेत. बेधडक आणि मनमोकळा स्वभाव हे त्यांचे वैशिष्ट्य होते. ओठात एक आणि पोटात एक असे पतंगरावांच्या बाबतीत कधीच झाले नाही. खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे म्हणण्याची त्यांची वृत्ती राजकारणात अभावानेच पाहायला मिळते. त्यांचे भाषण म्हणजे पर्वणीच. त्यांच्या भाषणात गावाकडचा रांगडेपणा असायचा. कार्यकर्त्यांचा गराडा कायम त्यांच्यासोबत असायचा. उदघाटनाच्या कार्यक्रमाला पतंगरावांनाच बोलवायचे असा कार्यकर्त्यांचा आग्रह असायचा. त्यांच्या कामाचा धडाका देखील जबरदस्त असायचा. आपल्या मतदारसंघात त्यांनी कामाचा डोंगर उभा केला होता. आपल्या मतदारसंघात एमआयडीसी उभारून त्यांनी अनेक उद्योगधंदे आणले. सूत गिरण्या, साखर कारखाने, वाईन पार्क, भारती विद्यापीठ, भारती हॉस्पिटल उभारून मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मिती केली. त्यांच्या कामाचा झपाटा इतका असायचा की, एकदा पु. ल. देशपांडे म्हणाले की, हे पतंगराव नव्हेत तर रॉकेटराव आहेत. पतंगराव कदम यांनी सहकार क्षेत्रातही आपला ठसा उमटविला. ९ मार्च २०१८ रोजी पतंगराव कदम यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील एक असामान्य व्यक्तिमत्व काळाच्या पडदयाआड गेले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी झाली. पतंगराव कदम यांना ७ व्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# टेंभुर्णी ग्रामपंचायतच्यावतीने महिलांना रजिस्टर-पेन वाटप



**टेंभुर्णी | प्रतिनिधी -** जाफाबाद तालुक्यातील टेंभुर्णी ग्रामपंचायत येथे जागतिक महिला दिनानिमित् स्त्रीशक्तीचा मान सन्मान करण्यात आला आशा सेविका अंगणवाडी ताई मदतनीस यांना रजिस्टर व पेन वाटप करण्यात आले यावेळी सरपंच सुमनबाई म्हस्के उपसरपंच कलमबाई मुळे ग्रामविकास अधिकारी जगदीश आढाव ग्रामपंचायत सदस्य विष्णु जमधडे शिवाजी मुळे किशोर काबळे ग्रामपंचायत कर्मचारी अजिस बागवान दिगंबर भिसे बाबासाहेब जमधडे सुनिल भाले अनिल गायकवाड योगेश गायमुखे अंगणवाडी ताई आशा सेविका मदतनीस यांची उपस्थित होते.

# महिलांच्या सुरक्षिततेसाठी शासन कुठेही कमी पडणार नाही - मुख्यमंत्री

**मुंबई -** महिलांच्या सुरक्षेसाठी शासन कडक कायदे करत आहे. कायद्याच्या अंमलबजावणीबरोबरच समाजात महिलांप्रति असलेली मानसिकता देखील बदलणे गरजेचे आहे. महिलांच्या तक्रारींचे तातडीने निरसन करण्यात येत आहे. समाजमाध्यमांवर मॉर्फिंग आणि डीपफेक व्हिडिओंच्या माध्यमातून होणारे गैरप्रकार थांबविण्यासाठी सायबर तंत्रज्ञानाच्या मदतीने अशा गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासन ठोस उपाययोजना करीत आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी शासन कुठेही कमी पडणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जागतिक महिला दिनानिमित्त महिला पत्रकारांसोबत साधलेल्या संवादादरम्यान दिली.

जागतिक महिला दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिला पत्रकारांना शुभेच्छा देऊन सह्याद्री अतिथीगृह येथे संवाद साधताना महिलांच्या सशक्तीकरणासंदर्भात महत्त्वाचे मुद्दे मांडले. महिलांना विविध क्षेत्रांमध्ये भेडसावणाऱ्या अडचणी, त्यांच्या सुरक्षेचे मुद्दे आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठीच्या सरकारी उपक्रमांवर त्यांनी प्रकाश टाकला. समाजाची मानसिकता बदलण्यासाठी आणि स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले. राज्यमंत्री पंकज भोयरसुद्धा यावेळी उपस्थित होते.

# जालन्याच्या मुजाहेद चौकातील डीपीला अचानक लागली आग

## घटनेत सुदैवाने जीवितहानी नाही

**जालना | प्रतिनिधी -** येथील मुजाहेद चौकातील डीपीला शनिवार (दि ८) रोजी दुपारच्या वेळेस अचानक आग लागल्याची घटना घडलीय. या घटनेत सुदैवाने जीवितहानी झाली नाहीये. विद्युत डीपीला अचानक आग लागल्याने मुजाहिद चौक भागातील नागरिकांमध्ये एकच गोंधळ उडाला होता. यावेळी डीपीला आग लागल्याची माहिती नागरिकांनी तातडीने अग्निशमन दलाच्या जवानांना दिली तसेच एम एस ई बी चे अधिकारी कर्मचाऱ्यांना दिली मात्र दोन्ही विभागाचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी न आल्याने शेवटी याभागातील नागरिकांना डीपीवर वाळू टाकून आग विझवावी लागली.

यावेळी परिसरातील नागरिकांनी आगीवर नियंत्रण मिळवले आहे. दरम्यान, डीपीला अचानक आग लागण्याचे कारण अजून समजू शकलेले नसून या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान मुजाहेद चौक भागातील नागरिकांनी डीपीला आग लागल्याची माहिती एम.एस.ई.बीच्या अधिकाऱ्यांना दिली. मात्र, एम एस ई बी चे अधिकारी तातडीने घटनास्थळी न आल्याने शेवटी याभागातील नागरिकांना डीपीवर वाळू टाकून आग विझवावी लागली. त्यामुळे या भागातील नागरिकांनी एमएसईबीच्या कारवाई बाबत नाराजी व्यक्त केली आहे.



# बौद्धिक अक्षम मुलांच्या शाळे तर्फे जागतिक महिला दिन साजरा

**पनवेल | प्रतिनिधी -** ८ मार्च जागतिक महिला दिन सर्व जगभर महिलांचा सन्मान करून साजरा केला जातो. डॉ.नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या शाळेत अभिनव पद्धतीने जागतिक महिला दिन साजरा केला गेला.पनवेल परिसरातील स्वतःचा व्यवसाय व कार्यक्षेत्रात आघाडीच्या भूमिका निभावणाऱ्या व समाजातील उपेक्षित घटक म्हणून दुर्लक्षित केलेल्या विशेष शाळेला मदत करणाऱ्या पाच प्रतिभा संपन्न महिलांचा सन्मान चिन्ह,सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांच्या पुनर्वसना करिता सातत्याने सहकार्य करणाऱ्या डॉ.समिधा गांधी,शाळेच्या उपक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थी व शिक्षक यांना प्रोत्साहन देणाऱ्या सौ.सलमा खान विद्यार्थ्यांसाठी सातत्याने उपक्रम राबविणाऱ्या इनरव्हील क्लबच्या डॉ.वीणा मनोहर मॅडम,विद्यार्थ्यांना शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाच्या



वेळेस वैयक्तिक व रोटरी क्लबच्या मार्फत खाऊ वाटप करणाऱ्या दीपा पंजाबी मॅडम,विद्यार्थी व पालक यांच्यासाठी शिबीर व कार्यशाळा यांना सहकार्य करणाऱ्या लायन्स क्लबच्या चंद्रा बोरा मॅडम,या कर्तबगार महिलांचा त्यांच्या कार्यस्थळी जाऊन त्या करत असलेल्या कार्यासाठी तसेच विशेष शाळेसाठी करत असलेल्या मदतीसाठी कृतज्ञतेच्या भावनेतून शाळेच्या विद्यार्थिनी व महिला कर्मचारी यांनी डॉ.नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन तर्फे महिला दिनाच्या शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला.

# ज्ञानतिर्थ इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे महिला दिन साजरा

**सिंधीकाळेगाव | प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील वखारी येथील ज्ञानतिर्थ इंग्लिश स्कूल एड ज्युनिअर कॉलेज वखारी येथे जागतिक महिला दिनानिमित्त भव्य सत्कार करण्यात आयोजित करण्यात आला.या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षिका अर्चना मेहेत्रे, प्रमुख पाहुणे सरस्वती गिराम, संस्थेच्या उपसचिव विद्या खैरे, उपाध्यक्षा माया भालमोडे यांच्या हस्ते राष्ट्रमाता जिजाऊ आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यासात आले.या प्रसंगी संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अण्णाभाऊ भालमोडे यांच्या हस्ते सर्व महिला शिक्षिका विद्या खैरे,सिंधु घोलप, सरस्वती गिराम, अर्चना मेहेत्रे, रेणुका केळकर, पल्लवी लहाने, धनश्री शेवाळे,निदा अर्षद काझी, गीता शिंदे, माया भालमोडे, अश्विनी ढोले,सोनु वाजगे, शायनी जोसेफ, पूनम राजमाने, अनिता चौधरी,दुर्गा परळकर, रीचा भोजने, अर्चना जाधव, ऐश्वर्या पुंड, सुनिता गंगातीवरे,त्रिवेणी दसरे, स्वाती ठाकरे, शामल तारख यांचा बुके आणि ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला.या सुत्र संचालन अर्चाना जाधव यांनी केले तर आभार विद्या खैरे यांनी मानले.




पान १ वरुन

## ट्रम्प अपमान ...

लावला आहे. तसेच अमेरिकन मालावर २५ टक्के अतिरिक्त सरचार्ज लावला आहे. तर चीनने अमेरिकेवर तेवढाच कर लावला आहे जितका अमेरिकेने चिनी मालावर लावला आहे.

अमेरिकेने भारताबरोबर द्विपक्षीय व्यापार वाढवण्यासाठी प्रॉडक्ट-बाय-प्रॉडक्ट व्यवस्थेशिवाय एका मोठ्या आणि व्यापक व्यापारी कराराचा प्रस्ताव पुढे ठेवला आहे. जीटीआरआयच्या एका रिपोर्टनुसार, हा व्यापारी करारमध्ये फक्त टॅरिफ मध्ये कपात नाही तर सरकारी खरेदी, कृषी सब्सिडी, पेटेंट कायदे आणि अनरिस्ट्रीक्टेड डेटा फ्लो संबंधीच्या मागण्या देखील मान्य होतील, ज्याला पूर्वीपासून भारताचा विरोध राहिला आहे. तसेच यामध्ये शिफारस करण्यात आली होती की भारताने ९० टक्क्यांहून अधिक औद्योगिक मालाचा समावेश असलेली एक व्यापक शुल्क व्यवस्थेचा विचार करावा. ज्यानुसार भारत तेव्हाच शुल्क रद्द करेल जेव्हा अमेरिका देखील असाच निर्णय घेईल.

# सीमा कपूरचे आत्मकथन 'युन गुजरि है अब तलक' प्रकाशीत

मुंबईत एक स्टार-स्टडेड आणि संस्मरणीय संध्याकाळ पाहायला मिळाली, जेव्हा बॉलिवूडच्या प्रसिद्ध लेखक-दिग्दर्शक सीमा कपूर यांच्या आत्मकथन युन गुजरि है अब तलक चे लोकार्पण झाले. या सोहळ्यात बॉलिवूडमधील अनेक दिग्गज उपस्थित होते, त्यामध्ये अणुपम खेर, परेश रावल, निर्माता बोनी कपूर, डॉ. अनु कपूर, दिव्या दत्ता, रघुबीर यादव, गायिका डॉ. जसपिंदर नरुला, लेखक-दिग्दर्शक रुमी जाफरी, रोनु मजुमदार आणि प्रतिभा कन्नन यांचा समावेश होता. या कार्यक्रमाचे आयोजन स्टुडिओ रिफ्यूलचे कुमार यांनी केले, आणि पुस्तक राजकमल प्रकाशन यांनी प्रकाशित केले आहे.

उज्जैनच्या डॉ. खुशबू पांछल यांनी संस्कृत श्लोकांनी कार्यक्रमाची सुरुवात केली. प्रसिद्ध दिग्दर्शक विधु विनोद चोप्रा यांचा एक व्हिडिओ संदेश देखील प्रदर्शित करण्यात आला, ज्यामध्ये त्यांनी सीमा कपूरच्या पुस्तकातील काही उतारे वाचले.

अनुपम खेर यांनी सीमा कपूरच्या कौतुकात म्हटले, मी सीमा कपूरला अनेक वर्षांपासून ओळखतो, आणि ती नेहमीच इतकी सुंदर राहिली आहे. सीमा कपूरने हे पुस्तक एका चित्रपटाच्या पटकथेप्रमाणे लिहिले आहे-वाचकांना असं वाटेल की ते एक चित्रपट पाहत आहेत. आपले अनुभव इतके प्रामाणिकपणे कागदावर उतरवणे हे दुर्मिळ आहे. मी या प्रकाशनाच्या कार्यक्रमात उपस्थित राहून खूप भाग्यवान आहे. सीमा कपूर ज्या प्रकारे आपले जीवन जगते, ते प्रेरणादायक आहे, आणि मला खात्री आहे की तिचा प्रवास अजूनही अद्भुत असेल.

सीमा कपूर यांनी कृतज्ञता व्यक्त करत सांगितले, मी सर्व पाहुण्यांचे आभार मानते, ज्यांनी आपल्या व्यस्त वेळेतून इथे उपस्थित राहण्याचा वेळ दिला. अणुपम खेर, परेश रावल, बोनी कपूर, रघुबीर यादव, दिव्या दत्ता, रुमी जाफरी आणि इतर सर्वांचे दिल से धन्यवाद. माझे मातरू आजोबा क्रांतिकारी होते, आणि माझ्या मातरू कुटुंबातील सर्व सदस्य बांगलादेशी कलाकार होते. माझे पिताजी एक कर्नल होते आणि त्यांनी दिल्लीमध्ये २००-२५० कलाकारांसह एक नाट्यसंस्था स्थापन केली. त्यानंतर सिनेमा आला आणि थिएटरचे महत्त्व कमी झाले, त्यामुळे पिताजींना कंपनी चालवण्यासाठी कर्ज घ्यावे लागले. माझ्या आईला तिच्या दागिन्यांची आणि साड्यांची विक्री करावी लागली. त्या वेळी थिएटर आणि लोककला उपेक्षित होत्या, आणि माझ्या कुटुंबाच्या नाट्य क्षेत्राशी संबंध असल्यामुळे मला सामाजिक वगळले जात होते. मी शाळेत केवळ अर्धा रोटी आणि लोणचं टिफिनमध्ये घेऊन जात असे.

डॉ. अनु कपूर यांनी कार्यक्रमाच्या समारोपात सांगितले, सीमा कपूरने अनेक संघर्ष, वेदना आणि कष्टांवर मात केली आहे. ती एक योद्धा आहे. ती आमचं एकटीचं बहीण आहे, आणि ती नेहमी हसतमुख राहते. ती नेहमी इतरांना मदत करण्यास




तयार असते. जीवन हे एक युद्ध आहे, आणि आपल्याला आपले युद्ध जिंकावे लागते. तिचे आत्मकथन संघर्षांची गोष्ट सांगते, आणि या पुस्तकात तिने आमच्या आईवडिलांना मान दिली आहे. हे खूप प्रेरणादायक वाचन आहे.

बोनी कपूर हे अश्रुपूरित झाले आणि सीमा कपूरच्या आत्मकथनाच्या प्रकाशनाबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन केले.

गायिका जसपिंदर नरुला यांनी सीमा कपूरच्या पुस्तकाच्या प्रकाशनाबद्दल आनंद व्यक्त केला आणि तिला शुभेच्छा दिल्या.

रघुबीर यादव यांनी सीमा कपूरच्या बालपणातील आठवणी सांगितल्या, ज्या ऐकून सर्वजण हसले.

परेश रावल यांनी सीमा कपूरच्या लेखन कौशल्याचे प्रशंसा केली आणि सांगितले, आत्मकथन लिहिणे हे सोपे काम नाही-ते अनेक आव्हानांसोबत असते. सीमा कपूरचे लेखन अप्रतिम आहे, आणि मी तिच्या लिखाणात भाग घेण्यासाठी मनापासून इच्छितो.




महिला आर्थिक विकास महामंडळ जालना नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण उद्धम विकास प्रकल्प च्या वतीने महिला बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे भव्य जिल्हास्तरीय प्रदर्शन व विक्री अनय गार्डन येथे आज खासदार कल्याणराव काळे यांच्या शुभहस्ते उद्घाटन संपन्न झाले यावेळी मामीचे जिल्हा समन्वयक श्री उमेश कहाते, जिल्हा उद्योग केंद्राचे अनंत शिंदे, कृषी विज्ञान केंद्राचे शशिकांत पाटील, श्री जयप्रकाश चव्हाण, धनंजय कुलकर्णी, प्रवीण कथे, जया नेमाने, गिरीश पाठक, रघुनाथ पंडित, दिपाली थेटे, शैलेश उखळकर, मीनाक्षी घायाळ, सुषमा कुलकर्णी, सविता देशमाने, लता चव्हाण, नीता कोठुळे व मीना साळवे यांच्यासह मोठ्या संख्येने बचत गटातील महिलांची उपस्थिती होती. (छाया - अनिल व्यवहारे)

# ‘चला जाणूया नदी’ला उपक्रमाबाबत आढावा बैठक संपन्न

**जालना | प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अभियानांतर्गत चला जाणूया नदीला हा उपक्रम १४ ऑक्टोबर २०२२ पासून राज्यभरात राबवित आहे. या अभियानामध्ये जालना जिल्ह्यातील कुंडलिका, सीना व जिवरेखा या नद्यांची निवड करण्यात आली आहे. या अनुषंगाने गुरुवार दि.०६ मार्च २०२५ रोजी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे सदस्य व जिल्ह्यातील नदी समन्वयक यांची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. यावेळी जिल्हास्तरीय समितीचे सचिव तथा सामाजिक वनीकरणाचे विभागीय वन अधिकारी सुरेश वडोदे यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी सामाजिक वनीकरणाचे विभागीय वन अधिकारी सुरेश वडोदे यांनी जालना जिल्ह्यामध्ये यापूर्वी अभियानासाठी निवड केलेल्या नद्यांच्या काठावरील ७ गावांमध्ये नदी संवाद यात्रा पूर्ण करण्यात आली असून १० गावांमध्ये क्षमता बांधणी प्रशिक्षण देण्यात आले असल्याचे सांगितले. निवड केलेल्या गावात संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना एक दिवसीय प्रशिक्षण देण्यात आले तसेच नदीकाठच्या निवडक गावांमधील शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या निबंध स्पर्धा घेण्यात आल्या असल्याचे सांगितले. तसेच यापूर्वी कुंडलिका व सीना नदीचा प्रकल्प आराखडा तयार करण्यात आला असून या आराखड्यानुसार विविध शासकीय यंत्रणा जसे की कृषी विभाग, प्रादेशिक वनविभाग, मृद व जलसंधारण विभाग, जिल्हा परिषद, सामाजिक वनीकरण विभाग व इतर विभागांनी प्रस्तावित केलेल्या व आतापर्यंत झालेल्या कामांचा आढावा घेऊन हा अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच हा उपक्रम पुढे राबविण्यासाठी जीव रेखा नदीचा नवीन कृती आराखडा तयार करणे, निवड केलेल्या उर्वरित गावांत जलसंवाद यात्रा आयोजित करणे, शालेय विद्यार्थ्यांना या उपक्रमामध्ये सहभागी करून घेण्यासाठी विविध स्पर्धा आयोजित करून त्यांना प्रमाणपत्र वितरीत करणे, नागरिकांमध्ये नद्यांबाबत जागरूकता येण्यासाठी जनजागृती करणे आदी बाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या. तसेच मार्च महिन्यातील करावयाच्या पुढील कामांसाठी येणाऱ्या खर्चाचा तपशील सादर करण्याविषयी सूचना देण्यात आल्या.

# शिर्डी जाणाऱ्या क्रुझर गाडीला सिंदखेडराजा जवळ भीषण अपघात

## दोघांचा मृत्यू, १० प्रवासी गंभीर जखमी



**जालना | प्रतिनिधी -** यवतमाळहून शिर्डी जाणाऱ्या क्रुझर गाडीला सिंदखेडराजा जवळ भीषण अपघात झाल्याची घटना घडलीय. या घटनेत दोघांचा मृत्यू झाला असून १० ते १२ प्रवासी जखमी झालेत. या अपघातात जखमी झालेल्या ९ जणांवर जालना जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आलेत. जालना जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू असलेल्या नऊ पैकी तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. कैलास चौधरी यांनी बोलताना दिली आहे. आज पहाटे यवतमाळ हुन शिर्डीकडे देव दर्शनाला जाण्यासाठी १२ ते १५ जण क्रुझर गाडीने निघाले होते. या दरम्यान, जालन्यापासून जवळच असलेल्या सिंदखेडराजा हद्दीतील समृद्धी महामार्गावर क्रुझर गाडीचे टायर फुटल्याने अपघात झाला. या घटनेत दोघांचा जागीच मृत्यू झाला असून १० ते १२ प्रवासी जखमी झाले असून सध्या जालना जिल्हा सामान्य रुग्णालयात जखमींवर उपचार सुरू करण्यात आले आहेत.

# जालना समाजकार्य महाविद्यालयामध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



**जालना | प्रतिनिधी -** कर्मवीर प्रतिष्ठान संचलित जालना समाजकार्य महाविद्यालयांमध्ये सांस्कृतिक विभागाच्या वतीने दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उप प्राचार्य डॉ.मधू खोब्रागडे हे उपस्थित होते तर यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. दिपक बुक्तरे ,प्रा. डॉ. बालाजी मुंडे, प्रा.डॉ.मीना बोर्डे, प्रा. डॉ. रेणुका बडवणे, डॉ. सुधीर गायकवाड,हे उपस्थित होते. यावेळी प्रथम प्रा. डॉ. मीना बोर्डे व प्रा.डॉ. रेणुका बडवणे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले व तदनंतर महाविद्यालयातील कर्तव्यदक्ष प्रा. डॉ. मीना बोर्डे व प्रा. डॉ. रेणुका बडवणे यांचा बुके देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रमाचे आयोजक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. दिपक बुक्तरे यांनी केले तर सूत्रसंचलन सोमेश गिरी यांनी केले तरी संदेश चव्हाण यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमास रोहन राठोड शिवाजी भुतेकर यांच्या सह सर्व विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय सम्यक कार्यसम्राट आदर्श शिक्षक पुरस्कार शेख अब्दुल रहीम यांना जाहीर!

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी -** कास्ट्राईब कर्मचारी महासंघ महाराष्ट्र राज्य प्रणित कास्ट्राईब शिक्षक संघटना जिल्हा, कोल्हापूरच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय सम्यक कार्यसम्राट आदर्श शिक्षक पुरस्कार हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर यांना जाहीर झाला आहे. राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीच्या बैठकीत एकमताने निवड करण्यात आली आहे. नुकतीच नावे जाहीर केली आहे. यामध्ये निवड समितीने शेख अब्दुल रहीम सर यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन राज्यस्तरीय सम्यक कार्यसम्राट आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड केली आहे. हा पुरस्कार कोल्हापूर येथे महिला दिनानिमित आयोजित शिक्षक मेळावा आणि सन्मान सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरुप स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पहार असे असेल. पुरस्कार स्विकारण्यासाठी शनिवार दि. ०८ मार्च २०२५ रोजी दुपारी १२.०० वा. श्रीराम मंगल कार्यालय, चिमगाव रोड, मुरगूड शिक्षक मंच, ता. कागल जिल्हा कोल्हापूर येथे सहपरिवार उपस्थित राहावे, असे आवाहन निवड पत्राद्वारे करण्यात आले. निवड पत्रावर कास्ट्राईब शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य संघटनेचे सरचिटणीस सतिष कांबळे सर यांची स्वाक्षरी आहे. शेख अब्दुल रहीम सर हे व्यवसायाने शिक्षक आहेत. ते हॅप्पी टू हेल्प फॉउंडेशनद्वारे विद्यार्थी-शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी



अहोरात्र प्रयत्नशील आहेत. विद्यार्थी-शिक्षकांसाठी वर्षभर अनेक उपक्रम राबवित असतात. कोणताही कार्यक्रमास पुष्पगुच्छ न देता पुस्तक भेट देणे या उपक्रमाचा गल्ली ते दिल्ली पर्यंतचा पायंडा त्यांनी पाडलेला आहे. पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# पाथ्रीकर कॅम्पस बदनापुर येथे भारतीय जनऔषधी दिवस कार्यक्रम संपन्न

**बदनापूर | प्रतिनिधी -** निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्ट, बदनापूर व प्रधानमंत्री भारतीय जनऔषधी परियोजना यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे अध्यक्ष डॉ. देवेश पाथ्रीकर यांच्या मार्गदर्शनाने इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, बदनापुर येथे जनऔषधी दिवसानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रधानमंत्री भारतीय जनऔषधी केंद्र आर.पी. रोड, जालनाच्या संचालिका राखी सर्वेश झंवर, जन औषधी परियोजना, केंद्र सरकार दिल्ली नोडल ऑफिसर शिवम पाटील तसेच जालना येथील सहाय्यक आयुक्त जाधव यांची उपस्थिती लाभली. यावेळी निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्टच्या वतीने इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, बदनापुरचे प्राचार्य डॉ. सुनील जायभाये यांच्या हस्ते सर्व मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी फार्मसी महाविद्यालयातील



उपस्थित विद्यार्थ्यांना सर्व मान्यवरांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. योगीराज मुळे यांनी केले. प्रा. संदीप फोके यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री कल्याण देवकत्ते तसेच सर्व प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी परिश्रम घेतले.

## शालेय पोषण आहार कामगार संघटना फेडरेशन

# कामगारांचा आझाद मैदान येथे एल्गार

**मुंबई -** मानधनात १ हजार रुपयाची वाढ झालेली आहे, त्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करा इत्यादीसह अनेक प्रलंबीत मागण्यांसाठी दिनांक ७ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र शालेय पोषण आहार कामगार संघटना फेडरेशनचे राज्य अध्यक्ष कॉ प्रा ए बी पाटील यांच्या नेतृत्वाखाली शालेय पोषण आहार कामगारांचा मोर्चा काढण्यात आला. असे दिलेल्या प्रसिद्ध पत्रकात फेडरेशनचे राज्य सरचिटणीस डॉ अशोक थोरात यांनी ही माहिती दिली.

या बाबत सविस्तर वृत्त असे की, राज्यातील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन देणाऱ्या शालेय पोषण आहार कामगारांमध्ये विधवा , परितकत्या, घटस्फोटीत, दलित, ओबीसी व गरीब घरातील गरजू पुरुष महिला काम करतात. त्यांना सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत अनेक प्रकारची कामे करावे लागतात. त्यांचा या कामांमध्ये ६ तास वेळ जातो आणि या मोबदल्यात त्यांना देशात इतके कमी मानधन कुठेच नाही असे ८३ रुपये रोज या प्रमाणे २५०० रुपये महिना मानधन दिले जाते. आणि ते पण वेळेवर मिळत नाही. ५ जुलै २०२४ रोजी राज्य शासनाने कॅबीनेट मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये शालेय पोषण आहार कामगारांच्या मानधनामध्ये १ हजार रुपयाची वाढ करून शासन निर्णय जाहीर केलेला आहे . पण त्याची अंमलबजावणी केली नाही. शालेय पोषण आहार कामगारांना १० महिने ऐवजी १२ महिने मानधन द्या,



शालेय पोषण आहार कामगारांना केरळ राज्य प्रमाणे १८००० रुपये मानधन द्या, भाऊबीज म्हणून दिवाळीच्या सणाला बोनस द्या, शालेय पोषण आहार कामगारांना शासकीय सेवेत कायम करा, वर्षातून दोन युनीफॉर्म द्या . ५ सप्टेंबर २०२४ च्या शासन निर्णयाचे प्रभावीपणे अंमलबजावणी करा. इत्यादी सह अनेक मागण्यांसाठी आझाद मैदान येथे महाराष्ट्रातून हजारो महिलांनी मोर्चा मध्ये सहभाग नोंदवला होता. या वेळी शासनाच्या विरोधात घोषणा देऊन आझाद मैदान घोषणांनी दणाणून सोडले होते. यावेळी पाच जणांचे शिष्टमंडळ शालेय शिक्षण मंत्री मा ना श्री दादासाहेब भुसे यांना भेटून सविस्तर चर्चा करण्यात आली. १ हजार रुपयांच्या वाढीसाठी या अधिवेशनामध्ये निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली जाईल अशा अनेक मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेतले जातील असे शालेय शिक्षणमंत्री यांनी आश्वासन दिले. यावेळी मोर्चाला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने वतीने सचिव मंडळ सदस्य कॉ शैलेंद्र कांबळे कॉ एस के रेगे , सीटू चे राज्य कोषाध्यक्ष कॉ के आर रघु , अंगणवाडी कर्मचारी युनियनच्या राज्याच्या नेत्या व सीटूच्या पदाधिकारी कॉ आरमायटी इराणी, तलासरी पंचायत समितीच्या सभापती कॉ सुनीता शिंगडा, कॉ ए बी पाटील, कॉ डॉ अशोक थोरात, कॉ मिरा शिंदे, कॉ अनिल मिसाळ, कॉ भैया देशकर, कॉ शरद पाटील यांनी मोर्चाला मार्गदर्शन केले. या वेळी त्यांच्या सह फेडरेशनचे सर्व पदाधिकारी व सदस्य यावेळी उपस्थित होते तसेच हा मोर्चा यशस्वी करण्यासाठी महादेव गारपवार, लता खेपकर, नंदा बांगर, हेमलता शेळके, रामचंद्र बरफ, वैशाली मुंजेवार, संगीता चौधरी, गणेश जाधव, संतोष शिर्के, कुसुमताई देशमुख, दिलीप पोपळे, सुरेश धायगुडे इत्यादी सह अनेक जिल्ह्याच्या व तालुक्याच्या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मोर्चा यशस्वी केला.

# जालना जनसेवा ग्रुप लावणार ११ गरीब मुलींचे विवाह

## एलईडी टीव्ही, फ्रिज आदी संसारोपयोगी साहित्य भेट देणार

**जालना | प्रतिनिधी -** सौ. जमुनाबाई शिवरतन बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष तथा उद्योजक पन्नालाल बगडिया यांच्या पुढाकारातून जालना जनसेवा ग्रुपच्यावतीने सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून दि. २० एप्रिल रोजी देवमूर्ती येथील मधुसूदन रिसॉर्टवर ११ गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलींच्या सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. नवविवाहित जोडप्यांना मनी मंगळसूत्रसह एलईडी टीव्ही, फ्रिज कुलर, वॉशिंग मशीन, संसार उपयोगी सर्व साहित्य भेट देण्यात येणार आहे.

या स्तुत्य उपक्रमाची संकल्पना ही पन्नालाल बगडिया यांची आहे. आपण स्वतःच्या मुलीचे लग्न जसे थाटामाटात करतो, तसेच या गरीब मुलींसाठीही हा सोहळा वैभवशाली करण्याचा संकल्प जालना जनसेवा ग्रुपने केला आहे. सामूहिक विवाह सोहळा म्हणजे केवळ संस्कारांचा संगम नाही, तर नवीन जीवनाच्या प्रवासासाठी भक्कम पाया ठरावा, या उद्देशाने आयोजित या सामाविक विवाह सोहळ्यातील जोडप्यांना मनी मंगळसूत्र, वधू-वरांचे कपडे, दोन्ही पक्षाकडून प्रत्येकी २५ वऱ्हाडी, हिंदू रीतीरीवाजानुसार विवाह संस्कार असा हा आदर्श विवाह ठरणार आहे. सामूहिक विवाह सोहळा म्हणजे केवळ संस्कारांचा संगमच नव्हे तर नवीन जीवनाच्या प्रवासासाठी भक्कम पाया ठरावा या उद्देशाने नवविवाहित एलईडी टीव्ही, फ्रिज, कुलर, वॉशिंग मशीन तसेच संपूर्ण संसारोपयोगी साहित्य भेट देऊन अनोखा आदर्श विवाह लावण्याचा संयोजकांचा प्रयत्न आहे. सद्य:स्थितीत ५ जोडप्यांची नोंदणी झाली असून, आणखी ६ जोडप्यांसाठी नोंदणी सुरू आहे. फक्त ११ जोडप्यांचीच नोंदणी होणार असल्याने इच्छुक गरीब कुटुंबातील पालकांनी तात्काळ जनसेवा ग्रुपचे अध्यक्ष पुरुषोत्तम मोतीवाला, पन्नालाल बगडिया, सुनील लाहोटी, डॉ. रामनारायण जैस्वाल, गोवर्धन अग्रवाल, ड. आनंद झा, श्रेनिक नानावटी, गणेश अग्रवाल, सुदेश करवा, नरेश गुप्ता, सतीश राठी, अनिल सोनी, निखिल तायल, अरुण लाहोटी, सूर्यनारायण गजबी, हेमंत जनसारी यांच्याशी संपर्क साधून नाव नोंदणी करावी, असे आवाहन जालना जनसेवा ग्रुप व जमुनाबाई शिवरतन बगडिया चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने पुरुषोत्तम मोतीवाला यांनी केले आहे.

# जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमनपदी गणेश पवार यांची निवड



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्था जाफराबादच्या चेअरमनपदी गणेश पवार यांची निवड करण्यात आली. विद्यमान चेअरमन विनोद कळंबे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने सोमवारी ता.३ चेअरमन निवडीसाठी पतसंस्थेच्या सभागृहात विशेष बैठकीच्या आयोजन करण्यात आले होते. चेअरमन पदासाठी गणेश पवार व सुखदेव अवकाळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. यावेळी घेण्यात आलेल्या मतदानामध्ये श्री पवार यांना ७ तर सुखदेव अवकाळे यांना सहा मते मिळाली.७ विरुद्ध ६ च्या फरकाने श्री पवार यांनी श्री अवकाळे यांचा पराभव केला.यावेळी संचालक विनोद कळंबे,वसंता शेवाळे,प्रदीप ताठे, दिपक चव्हाण,संजय लोखंडे, छाया पुंगळे,सुखदेव अवकाळे,अभिजीत साळवे,संजय निकम,किरण तिडके, गणेश फुकट, सुनीता खलसे यांची उपस्थिती होती.निवडणूक निर्वाचन अधिकारी म्हणून श्री बावस्कर यांनी काम पाहिले,त्यांना श्रीराम देठे आणि प्रविण अंभोरे यांनी सहकार्य केले.यावेळी प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष भगवान भालके, माजी चेअरमन भगवान दळवी,दिनकर भोसले, बळीराम उभरहंडे, तालुकाध्यक्ष प्रदिप साळोख,रिजवान शेख,गजानन मांटे, अशोक चिंचोले, काशिनाथ उखर्डे, दामोधर डोईफोडे, बद्रीनाथ जायभाये, प्रहार चे अध्यक्ष कैलास बकाल, अनंता जंजाळ, जे. पी.जाधव,नारायण मेरत, अनिल भोसले, रामेश्वर पवार, विष्णू इंगळे, किशोर महाजन,पंकज पाटील,सावता तिडके,गणेश लहाने,विलास शेजुळ, उद्धव जायभाये, शेळके बापू, पुंडलिक बोडखे यांच्यासह उपस्थित सगळ्यांनी व तालुक्यांतील सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी श्री पवार यांच्या निवडीचे स्वागत केले आहे.

# गर्भमुख कॅन्सर निदानासाठी मोफत पॅपस्मियर तपासणी शिबिरास सुरुवात

## लायन्स क्लब व जिल्हा सामान्य रुग्णालयाचा संयुक्त उपक्रम



**जालना । प्रतिनिधी -** महिलांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने लायन्स क्लब जालना आणि जिल्हा सामान्य रुग्णालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने ८ ते १९ मार्चदरम्यान आयोजित मोफत पॅप स्मियर तपासणी शिबिराला जागतिक महिलादिनी शनिवार दि. ८ मार्चपासून सुरुवात झाली असून महिलांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. शिबिराच्या पहिल्याच दिवशी सात महिलांची पॅप स्मियर तपासणी करण्यात आली.

जिल्हा सामान्य रुग्णालयात सुरू असलेल्या या शिबिराच्या माध्यमातून गर्भमुख (सर्व्हायकल) कॅन्सरचे सुरुवातीच्या टप्प्यात निदान होण्यास मदत होणार आहे. यामुळे महिलांना वेळेत उपचार घेता येतील आणि कॅन्सरमुक्त जीवन जगता येईल. या शिबिरात जिल्हा सामान्य रुग्णालयाचे तज्ज्ञ डॉक्टर आणि परिचारिका सेवा देणार आहेत. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. प्रज्ञा कोयाळकर आणि डॉ. स्मिता पंडीत यांनी महिलांना तपासणीविषयी मार्गदर्शन केले. तसेच परिचारिका सुलोचना पढघण आणि त्रीशुला पाईकवार यांनी तपासणी प्रक्रियेत सहकार्य केले.

यावेळी लायन्स क्लबच्या अध्यक्षा जयश्री लड्ढा, सदस्य संगीता रुणवाल, संगीता भक्कड, मीरा राठोड, डॉ. गिरीश पाकणीकर, डॉ. माधुरी पाकणीकर, मोहन राठोड आणि अतुल लड्ढा उपस्थित होते.

महिला दिनाच्या निमित्ताने सुरू करण्यात आलेले हे मोफत शिबिर जिल्हा सामान्य रुग्णालयात १९ मार्चपर्यंत चालू राहणार आहे. महिलांनी शिबिराचा लाभ घ्यावा आणि ९९६०६३४५९७ ह्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून आपली वेळ सुनिश्चित करुन घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.